# जिल्हाधिकारी कार्यालय अहमदनगर

**(आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन शाखा)**

scy.ahmednagar@gmail.com (टोल फ्री क्रं.1077) दुरध्वनी क्र. 0241-2343600

---

**विषय - कोरोना विषाणू (कोव्हीड19) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपयायोजना करण्याबाबत.**

**वाचावे** - 1. आपत्ती व्यावस्थापन कायदा, 2005.

2. साथ रोग अधिनियम 1897
3. सार्वजनिक आरोग्य विभाग यांची आधिसुचना कोरोना 2020/प्र.क्र.58/आरोग्य 5,दि.14/03/2020.
4. शासन अधिसूचना क्रमांक डीएमयु/2020/प्र.क्र.92/डीआयएसएम-1 दिनांक 25मार्च 2020.
5. शासन अधिसूचना क्रमांक डीएमयु/2020/प्र.क्र.92/डीआयएसएम-1 दिनांक 13 एप्रिल 2020.
6. महसुल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील आदेश क्र.डीएमयु/2020/सीआर-92/ डीएसएम-1, दि.17 एप्रिल 2020.
7. महसुल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील आदेश क्र.डीएमयु/2020/सीआर-92/ डीएसएम-1, दि. 2 मे 2020
8. या कार्यालयाकडील आदेश क्र.डीसी/कार्या19ब1/869/2020 दि.03/05/2020

| | | |
|---|---|---|
| क्र. आव्यमपु/कार्या 19अ/३९१ /2020 | **आदेश** | अहमदनगर दि.०५/05/2020 |

ज्याअर्थी, राज्य शासनाने कोरोना विषाणूचा (कोव्हीड 19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग अधिनियम 1897 दिनांक 13 मार्च 2020 पासून लागू करुन खंड 2,3,4 मधील तरतुदीनुसार अधिसुचना निर्गमित केलेली आहे. त्याअन्वये जिल्हाधिकारी हे त्यांचे कार्यक्षेत्रात कोव्हीड 19 वर नियंत्रण आणण्यासाठी व त्यांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाययोजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी सक्षम प्राधिकारी घोषीत करण्यात आलेले आहेत.

ज्याअर्थी, संदर्भ क्र.8 अन्वये कोरोना विषाणूचा संसर्ग व प्रादुर्भाव पसरण्याची शक्यता लक्षात घेता त्यावर तात्काळ नियंत्रण करणेकामी प्रतिबंधात्मक आदेश पारित करण्यात आलेले आहेत. तसेच अत्यावश्यक सेवा वगळता इतर कामांसाठी व्यक्तीच्या हालचालीवर संध्याकाळी 7.00 ते सकाळी 7.00 या कालावधीत निर्बंध लागू राहील असे आदेशित करण्यात आलेले आहे. नागरिकांची अनावश्यक गर्दी टाळण्यासाठी जिल्हयातील मेडीकल दुकाने, हॉस्पीटल, क्लिनीक, डिझेल पंप, एटीएम इ. वगळता सर्व दुकाने संध्याकाळी 7.00 ते सकाळी 7.00 या कालावधीत बंद ठेवणे आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी, जिल्हाधिकारी अहमदनगर साथ रोग प्रतिबंधात्मक अधिनियम 1897 अन्वये निर्गमित करण्यात आलेली अधिसूचना व नियमावलीमधील तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार नागरिकांची होणारी गर्दी टाळणेकामी **जिल्हयातील नागरी व ग्रामिण भागातील मेडीकल दुकाने, हॉस्पीटल, क्लिनीक, डिझेल पंप, पेट्रोल पंप, एटीएम इ. अत्यावश्यक सेवा, कार्यालये, आस्थापना वगळून इतर सर्व दुकाने दि.17/05/2020 पर्यंत संध्याकाळी 7.00 ते सकाळी 7.00 या कालावधीत बंद ठेवण्यात यावी. तसेच या कालावधीत उपरोक्त अत्यावश्यक सेवा वगळून इतर कामांसाठी व्यक्तीच्या हालचालीवर निर्बंध असल्याबाबत आदेशीत करीत आहे.**

कोणतीही व्यक्ती/संस्था/संघटना यांनी उक्त आदेशाचे उल्लंघन केल्यास ते भारतीय दंड संहिता (45 ऑफ 1860) च्या कलम 188 नुसार दंडनिय/कायदेशीर कारवाईस पात्र राहतील.

जिल्हाधिकारी अहमदनगर

(राहुल द्विवेदी)
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, अहमदनगर**

**प्रति,**

1. जिल्हा पोलीस अधिक्षक, अहमदनगर यांचेकडेस कार्यवाहीसाठी.
2. आयुक्त, महानगरपालीका, अहमदनगर यांचेकडेस कार्यवाहीसाठी.
3. जिल्हा माहिती अधिकारी, अहमदनगर यांचेकडेस प्रसिध्दीसाठी .
4. उपविभागीय दंडाधिकारी (सर्व) --------- यांचेकडेस कार्यवाहीसाठी.
5. तहसिलदार तथा घटना व्यवस्थापक (Incident Commander) (सर्व) -------- यांचेकडेस कार्यवाहीसाठी.
6. मुख्याधिकारी नगरपालीका / नगरपंचायत (सर्व) -------- यांचेकडेस कार्यवाहीसाठी.

**प्रत** - सर्व विभाग प्रमुख/आस्थापना प्रमुख, अहमदनगर जिल्हा.